Our solution rises you better
"SUCCESS CLASSES"
No.1 Coaching Institute For Improvement
ADMISSION OPEN
JEE, NEET, MHT-CET
11th Science
Limited Admission
Add-Opp.to Sangola S.T.Stand, Bhopale Road, Sangola
7387851467/8830602065

माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२
www.mandootexpress.com
email- mandootexpress5@gmail.com
संपादक-मोहन मस्के मो.९८५०४०३७७३
■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■

चौगुले सायन्स क्लासेस
(ICAR, NEET, JEE, MHT-CET)
1 जून पासून सुरू
11th Science
Mob.7620020178 / 9545642803
पत्ता : न्यू इंग्लिश स्कूल जवळ, सांगोला.

वर्ष-२४ वे | अंक -२६१ | पृष्ठे-४ | मूल्य - १ रुपये | रविवार दि.१२ जुलै २०२६ | R.N.I. NO. MAHMAR/2002/10619

हॉटेल सितारा
सांगोला महाविद्यालय शेजारी, कडलास रोड सांगोला
7998065555 / 7998065555 / 9193205555
लक्षवेदी टेरेस गार्डन
गार्डन डायनिंग हॉल
प्रशिक्षित महिला स्टाफ
पार्टीसाठी अनेक पर्याय
AC / Delux रूम्स
मोठी सुसज्ज पार्किंग
FREE WiFi
24x7 ग्राहक सेवा




# सांगोला इनरव्हील क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा आज पदग्रहण समारंभ

सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला इनरव्हील क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा आज रविवार, दिनांक १२ जुलै २०२६ रोजी ठीक सकाळी ११:०० वाजता श्रीराम हॉटेल (सोलापूर-कोल्हापूर रोड, सांगोला) येथे पदग्रहण समारंभ संपन्न होणार असल्याची माहिती नूतन अध्यक्षा सौ वर्षा बलाक्षे यांनी दिली .







पदग्रहण समारंभास प्रमुख पाहुण्या म्हणून सोलापूर इनरव्हील क्लबच्या संस्थापिका सदस्या सौ. रेखा धनंजय माने उपस्थित राहणार आहेत. सौ.रेखा माने या गेली ४० वर्षे इनरव्हील क्लबमध्ये सक्रिय असून त्यांनी सोलापूर क्लबमधील सर्व महत्त्वाची पदे भूषविली आहेत. २००१ मध्ये त्यांची 'डिस्ट्रिक्ट एडिटर' तर २००५-०६ मध्ये 'डिस्ट्रिक्ट चेअरमन' म्हणून काम केले आहे.अनेक वेळा 'झोनल को-ऑर्डिनेटर' म्हणून काम केले आहे. सर्व डिस्टिक फंक्शन अटेंड करतात. सोलापूरचे प्रसिद्ध फौजदारी वकील श्री धनंजय माने यांच्या त्या पत्नी आहेत. सौ.रेखा माने या इनरव्हील क्लब व्यतिरिक्त सई मराठा महिला मंडळ भगिनी समाज संस्कृती प्रतिष्ठान इत्यादी संस्थांवर काम केले आहे. रिमांड होम सोलापूरच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड झाली आहे.त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा मार्गदर्शनाचा लाभ सांगोला क्लबला मिळणार आहे.

पदग्रहण सोहळ्यात २०२६-२७ इनरव्हील सांगोला क्लबच्या नूतन अध्यक्षा सौ. वर्षा बलाक्षे, सेक्रेटरी सौ.वनिता चव्हाण, व्हा.प्रेसिडेंट सौ.वंदना महिमकर, ट्रेझरर सौ.उमा उंटवाले, आय एस ओ सौ.अंजना बनकर, एडिटर सौ.दिपाली कोळसे पाटील सी.एल.सी.सी. सौ.मंगल चौगुले या पदावरती काम पाहणार आहेत.

तरी दिमाखदार पदग्रहण सोहळ्याला सांगोला परिसरातील नागरिकांनी व हितचिंतकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नवनियुक्त अध्यक्षा सौ.वर्षा बलाक्षे व सेक्रेटरी वनिता चव्हाण यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी डीपीडीसी बैठकीत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची प्रभावी मांडणी

सांगोला( प्रतिनिधी) :- सोलापूर जिल्हा नियोजन समिती बैठकीत सांगोला विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आणि ग्रामीण भागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी ठामपणे मांडले. विशेषतः शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन वीज वितरण व्यवस्था, सिंचन आणि दुष्काळी परिस्थितीवर त्यांनी बैठकीत लक्ष वेधले.



बैठकीत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील डीपी (ट्रान्सफॉर्मर) उपलब्धतेचा प्रश्न, नदीकाठच्या परिसरातील वीजवाहिन्यांची क्षमता वाढविणे, तसेच अल-निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी बळीराजासाठी टेंभू योजना, म्हैसाळ योजना आणि नीरा उजवा कालवा क्रमांक ३, ४ व ५ मधून पाणी तातडीने सोडण्याची मागणी केली. शेतकऱ्यांना वेळेवर वीज आणि सिंचनाचे पाणी मिळणे अत्यावश्यक असून, यासाठी संबंधित विभागांनी तातडीने नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही भूमिका त्यांनी बैठकीत मांडली.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांची दखल घेत ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सांगोला विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे थेट आदेश दिले.

या बैठकीमुळे सांगोला तालुक्यातील वीज, सिंचन आणि दुष्काळ निवारणाशी संबंधित प्रश्न सोडविण्यास गती मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी आणि नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# वडिलांच्या स्मृतीदिनी वाटंबरे येथे सामाजिक उपक्रम संपन्न




सांगोला (वार्ताहर):- सांगोला तालुक्यातील वाटंबरे येथील दिवंगत लक्ष्मण मोरे यांच्या द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये यशस्वी उद्योजक पुरस्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, आरोग्य तपासणी व वृक्षारोपण या उपक्रमांचा समावेश होता.

वाटंबरे येथील व्यापारी लक्ष्मण मोरे यांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यांचा मुलगा प्रा डॉ जवाहर मोरे यांनी वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विविध उपक्रम राबविले. उद्योगपती दत्तात्रय माळी यांना यशस्वी उद्योजक पुरस्कार माणिक मोरे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज वाटंबरे येथून दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या आदित्य शिंदे, अभिषेक पवार, कार्तिकी पवार, अश्विनी बोरगे, सुप्रिया बाड, अश्विनी खरात, वर्षा खुळे, धनश्री चव्हाण, वैष्णवी बाड या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तद्नंतर सांगोला येथील आरोग्य सल्लागार डी.एम.जाधव यांनी उपस्थितांना आरोग्याविषयी मार्गदर्शन करुन मोफत तपासणी केली. यामध्ये जवळजवळ ७५ लोकांची तपासणी करण्यात आली. यावेळी मागेल त्याला झाड या उपक्रमाअंतर्गत आप्पासो धनवडे यांच्या घरासमोर वृक्षारोपण करण्यात आले. संध्याकाळी जनसेवा गायन पार्टी उंबरगाव यांचा गीतांचा कार्यक्रम पार पडला. बौध्दाचार्य बापूसाहेब ठोकळे यांनी पुण्यस्मरण विधी पार पाडला.विनोद धनवडे यांनी दत्तात्रय माळी यांचा परीचय करुन दिला.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन बाळासाहेब धनवडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिनेश धनवडे, संजय धनवडे, निलेश धनवडे, पंकज धनवडे, विघ्नेश बनसोडे, संस्कार धनवडे, यांनी अथक परिश्रम घेतले.

## पुन्हा अतिवृष्टीचा इशारा, पाऊस धुमाकूळ घालणार, हवामान विभागाचा मोठा इशारा

पुणे:- गेल्या दोन दिवसांपासून राज्यात पावसाने उघडीप दिली असून, तापमानात देखील वाढ झाली आहे. दरम्यान आता पावसाबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे भारतीय हवामान विभागाकडून दिल्ली, उत्तर प्रदेशसह १८ राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे, त्यामुळे गरज असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे असं आवाहन भारतीय हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे. या काळात प्रति तास ७० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे

# रोटरी क्लब व सिद्धकला आयुर्वेदतर्फे १५ जुलै रोजी मोफत सुवर्णप्राशन शिबिर

सांगोला (प्रतिनिधी) : रोटरी क्लब ऑफ सांगोला आणि सिद्धकला आयुर्वेद पंचकर्म व गर्भसंस्कार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ० ते १६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी मोफत सुवर्णप्राशन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर बुधवार दि.१५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.०० ते ८.३० या वेळेत सिद्धकला आयुर्वेद पंचकर्म व गर्भसंस्कार केंद्र, गणेश नगर, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, वासुद रोड, सांगोला येथे होणार आहे.

आयुर्वेदामध्ये सुवर्णप्राशनाला विशेष महत्त्व असून ते बालकांची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास, स्मरणशक्ती, बुद्धिमत्ता व एकाग्रता विकसित करण्यास, शारीरिक व मानसिक वाढीस चालना देण्यास तसेच वारंवार होणाऱ्या आजारांपासून संरक्षण करण्यास उपयुक्त मानले जाते. निरोगी व सुदृढ बालविकासासाठी सुवर्णप्राशन लाभदायी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या शिबिरानिमित्त एक विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून, सुवर्णप्राशनासाठी येणाऱ्या प्रत्येक बालकाच्या पालकांना मोफत आयुर्वेदिक आरोग्य सल्ला (फ्री कन्सल्टेशन) दिला जाणार आहे. तसेच शिबिराचा लाभ घेण्यासाठी शिबिराच्या दिवशी नाव नोंदणी करणे आवश्यक असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

या शिबिरामध्ये सर्व पात्र बालकांना सुवर्णप्राशन पूर्णपणे मोफत दिले जाणार आहे. त्यामुळे सांगोला शहर व परिसरातील पालकांनी आपल्या मुलांसह उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांगोला रोटरी क्लबचे अध्यक्ष माणिक भोसले व सचिव शरणाप्पा हळ्ळीसागर यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी मो.८२०८४५४५९२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार



सांगोला:- सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये सन २०२५-२६ च्या एसएससी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. याचबरोबर विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा तसेच इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे मोलाचे योगदान अधोरेखित करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी काही गुणवंत विद्यार्थी तसेच पालकांनी मनोगत व्यक्त करत सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या दर्जेदार शिक्षणपद्धती, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रशालेच्या प्रांगणात आकर्षक सजावट, उत्साही वातावरण आणि टाळ्यांच्या कडकडाटात संपन्न झालेल्या या दिमाखदार कार्यक्रमास संस्थाध्यक्षा अनिता इंगवले, मुख्याध्यापिका सौ. प्रमोदिनी जाधव, सर्व शिक्षकवृंद, पालक ,विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. श्रुती हसबनीस यांनी आपल्या प्रभावी, ओघवत्या आणि बहारदार शैलीत केले, तर आभार प्रदर्शन सौ. स्वाती भंडारे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. स्वाती भंडारे व सौ.वैशाली लेंडवे यांच्यासह इतर सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

टायटल क्लियर एन.ए. झालेले
प्लॉट्स विकणे आहेत
स्वतंत्र ७/१२ उतारा, ३० फुटी रस्ता, लाईट, पाणी व अंडर ग्राउंड ड्रेनेज होम लोन इत्यादी सुविधांसह उपलब्ध.
पत्ता. ह.भ.प. कै.शारदादेवी साळुंखे-पाटील नगर जवळा-घेरडी रोड जवळा (भोपसेवाडी) ता. सांगोला
संपर्क: इनामदार ट्रेडर्स.
7517595937, 8329843589

माडगुळकर ज्वेलर्स
महात्मा फुले चौक, सांगोला.
संपर्क : 7057667763
सोने विभाग
चांदी विभाग
कोणत्याही दागिन्यांची घडणावळ 10% पासून सुरु
डायमंड विभाग
१ ग्रॅम ज्वेलरी विभाग
गोल्ड टेस्टिंग मशीन

# बेरोजगारांना काम द्या ना...

राज्यात जनगणनेबरोबरच मतदार याद्या दुरूस्तीचे काम जोमाने सुरू असल्याचे पहायला मिळते. जनगणनेबरोबरच मतदार याद्यांच्या फेरतपासणीच्या कामाला शालेय शिक्षकांनाच जुंपण्याचा परिणाम त्याच्या मुख्य म्हणजे शाळेत शिकवण्याच्या कामावर होतो आहे.,अशी तक्रार होते आहे. शिक्षक, अंगणवाडी ताई, आशा वर्कर्स, बँक कर्मचारी यांना अशा कामातून वगळण्यासाठी वेगळ्या पद्धतीने विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात २९ जून ते ३१ जुलै २०२६ या काळात विविध सरकारी कर्मचारी 'एसआयआर'(मतदारयाद्यांची सखोल विशेष फेरतपासणी)च्या कामात गुंतलेले आहेत. केंद्र आणि राज्य शासनाचे कर्मचारी निवडणूक आयोगाच्या कामात गुंतल्यामुळे त्यांच्या नियोजित कामांचा खोळंबा होतच असणार, त्यामुळे ज्यांची कामे खोळंबतात त्या नागरिकांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागतच असणार. पण काही कर्मचाऱ्यांची दैनंदिन नियोजित कामे खोळंबून राहणे हे अशक्यप्राय असते. कारण ती कामे त्याच वेळी होणे गरजेचे असते, ती प्रलंबित ठेवणे शक्य नसते. अशा कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाची कामे दिली जातात, तेव्हा त्यांना आपले निर्धारित दैनंदिन कार्य आणि निवडणूक आयोगाने दिलेले कार्य ही दोन्ही कामे करणे अत्यंत कठीण असते. निवडणूक काळात जिल्हाधिकारी निवडणूक आयोगाचे जिल्हा पातळीवरील प्रतिनिधी म्हणून काम करत असतात. त्यांना या काळात बरेच अधिकार प्राप्त झालेले असतात. त्या अधिकारांतर्गत ते निवडणूक कार्य सोपविलेल्या कर्मचाऱ्यांवर अनुशासनात्मक कठोर कार्यवाही करू शकतात. त्यामुळे असे कर्मचारी अडचणीत सापडलेले दिसतात. यात शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर यांच्यासारखे कर्मचारी आणि बँक कर्मचारी प्रामुख्याने येतात. सध्या या संदर्भातील शिक्षकांविषयीच्या बातम्या रोज वर्तमानपत्रातून झळकत असतात. नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदललेला अभ्यासक्रम आहे. त्याची तयारी शिक्षकांना करायची आहे. नवीन सत्रात पुरेसे विद्यार्थी दाखल झाले नाहीत तर शाळा बंद पडण्याची तलवार डोक्यावर लटकत असते; तेव्हा विद्यार्थी शोधत फिरणे हेदेखील याच काळात शिक्षकांच्या मागे लागलेले काम आहे. शिवाय नोकरीत टिकून राहणे आणि पदोन्नतीसाठी 'शिक्षक पात्रता परीक्षा' पास होणेदेखील त्यांना अनिवार्य करण्यात आलेले आहे. कारण प्रश्न नोकरी टिकवून ठेवण्याचा आहे. या सगळ्यामुळे त्यांच्या संघटनांनी ९ जुलै रोजी 'शाळा बंद' आंदोलन केले. 'काही ठरावीक कामे वगळता शिक्षकांना अशैक्षणिक कामे दिली जाऊ नयेत', अशी शिक्षण हक्क कायद्यात तरतूद असूनही, 'एसआयआर'च्या कामातून मुक्त केले जात नाही, अशी शिक्षकांची तक्रार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देऊन त्यांना सुट्टीच्या दिवशी तसेच शैक्षणिक कामाच्या वेळेनंतर 'बीएलओ'चे काम देण्याच्या सूचना आल्या आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना लिहिलेल्या एका पत्रानुसार 'बीएलओ'चे काम करणाऱ्या शिक्षकांना कमी तासिका देण्यात याव्यात, असे म्हटले आहे. नीती आयोगाच्या अहवालानुसार राज्यात आठ हजारांहून अधिक एक शिक्षकी शाळा आहेत. त्यात सुमारे दीड लाखाहून अधिक विद्यार्थी शिकतात. आधीच शिक्षणाचा बट्ट्याबोळ झालेला असताना, महिनाभर शिक्षक शाळेतून बाहेर असतील, तर मुलांच्या शिक्षण हक्काचे काय, असा प्रश्न विचारला जात आहे. म्हणजे एक तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडून 'बीएलओ'चे काम करायचे किंवा शाळा आटोपल्यावर तसेच सुट्टीच्या दिवशी 'बीएलओ'चे काम करायचे. जनगणनेची प्रथम फेरी आटोपली आहे, पुढे दुसरी फेरी आहेच. शिवाय शिक्षक पात्रता परीक्षेची तयारी, घरोघर फिरून नवीन विद्यार्थी शाळेत आणणे, इत्यादी कामे आहेतच. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शून्य ते सहा वयोगटातील मुलांना पोषण आहार देणे, त्यांच्या आरोग्याचा नियमित लेखाजोखा ठेवणे, तीन ते सहा वयोगटातील मुलांना पूर्वप्राथमिक शिक्षण देणे, शिवाय विविध सर्वेक्षणे करणे आदी कामे रोज करावी लागतात. त्यात प्रत्येक गोष्टीची माहिती ऑनलाइन भरायची असते. ग्रामीण भागात 'इंटरनेट'च्या समस्येमुळे ती भरण्यात बराच वेळ जातो. या सर्व कामांव्यतिरिक्त त्यांनाही 'बीएलओ'चे काम देण्यात येत आहे. वास्तविक 'अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आयसीडीएस सेवांव्यतिरिक्त इतर कामे दिली जाऊ नयेत', अशा आशयाचे महिला बालकल्याणमंत्री, महिला बालकल्याण सचिव, महिला बालकल्याण आयुक्त आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांचे आदेश आहेत. पण तहसीलदार पातळीवरील कर्मचारी या आदेशांना भीक घालत नाहीत. उलट ते अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दंडात्मक कारवाई करण्याच्या धमक्या देत आहेत. म्हणजे या बाबतीतही अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी शून्य ते सहा वयोगटातील मुलांना पोषण आहार देणे बंद करून किंवा सात तासांच्या आपल्या कार्यालयीन वेळेनंतर तसेच सुट्टीच्या दिवशीदेखील 'बीएलओ'चे काम करावे, असाच एकंदर खाक्या आहे. गरोदर महिला आणि स्तनदा मातांना सेवा पुरवण्याचे काम करणाऱ्या आशा वर्करलाही आपली आरोग्यविषयक दैनंदिन कामे करून अशाच साऱ्या अडचणींसह 'एसआयआर'चे काम करायचे आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या संदर्भात तर अधिकच बिकट परिस्थिती असते. अर्थात त्यांना 'एसआयआर'चे काम दिलेले नसले तरी निवडणुकांच्या वेळी त्यांनाही या कामात लावले जाते. निवडणुकीच्या वेळी त्या संदर्भातील प्रशिक्षण, मतदानाच्या वेळचे काम आणि मतमोजणीचे काम असे मिळून किमान पाच ते सहा दिवस ते त्यात व्यस्त असतात. या सर्व दिवशी बँका मात्र सुरूच ठेवायच्या असतात. दहा-बारा कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या जागी तीन-चार जण बँक चालवत असतात. अनेकदा तर किल्लीधारी अधिकाऱ्यांसकट शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांना निवडणूक कामात बोलावले जाते. तरीही बँक सुरू राहावी हीच अपेक्षा असते. आता ही किमया कशी करणार, हा मोठाच प्रश्न असतो. निवडणूक अधिकाऱ्यांना या अडचणी सांगितल्या तर ते फौजदारी कारवाईच्या धमक्या देतात. वास्तविक अशी दैनंदिन स्वरूपाची तसेच प्रलंबित ठेवता न येण्याजोगी कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यातून सुटका मिळायला हवी. हे सर्व करवून घेताना, 'हे राष्ट्रीय कर्तव्य आहे' असे सांगितले जाते. म्हणजे मग मुलांना शिकवणे, शून्य ते सहा वयोगटातील मुलांना पोषण आहार देणे तसेच पूर्वप्राथमिक शिक्षण देणे, आरोग्याच्या सेवा देणे किंवा बँका चालवणे हे राष्ट्रीय कर्तव्य नाही का? 'एसआयआर' असो वा निवडणुकीचे काम असो, यात विशेष कौशल्याची आवश्यकता नसते. या कर्मचाऱ्यांनाही काही दिवसांचे प्रशिक्षण देऊनच त्याा कामी लावले जाते. आपल्या देशात सुमारे तीन ते चार कोटी सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्याांनादेखील या कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रशिक्षण देऊन या कामात घेतले जाऊ शकते. आधीच कामाच्या जबाबदऱ्या असलेल्या आणि त्यामुळे दडपणाखाली काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांपेक्षा ज्यांना उत्पन्नाची गरज आहे, असे हे तरुण अधिक मन लावून करतील. शिवाय उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामाचा जो खोळंबा होतो, तो होणार नाही. त्यांच्यावरील मानसिक दडपणातून त्यांना मुक्तता मिळेल. गोपनीयतेच्या कारणाने सरकारी नोकरीत असलेल्यांनाच हे काम दिले जाते, असे सांगितले जाते. खरे तर निवडणुकीच्या कामात गोपनीय असे काहीच नसते. केवळ ते काम व्यवस्थित आणि काटेकोरपणे करायचे असते. तेव्हा निवडणूक आयोगाने नोकरीत असलेल्यांनाच काम देण्याचा आग्रह सोडून अशा प्रकारे सुशिक्षित बेरोजगारांना या कामात घेतले तर या बेरोजगारांनाही किमान काही काळासाठी तरी रोजगार मिळेल. सरकारला अनेक बाबतीत मदत होईल.

माणदूत एक्सप्रेस हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक मोहन शंकर मस्के यांनी भास्कर प्रिटींग प्रेस प्रा.लि. रामदेव वेअर हाऊस, हैद्राबाद रोड, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून १०३२/२ ब लोहार गल्ली, सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर पि.नं.४१३३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
माणदूत एक्सप्रेस
EMail: mandootexpress5@gmail.com
दै.माणदूत एक्सप्रेसमधील प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, जाहीराती व लेखातील मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहात संपन्न

## शिक्षकांबरोबर पालकांचेही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान महत्त्वाचे.-डॉ.अनिकेत देशमुख





सांगोला (प्रतिनिधी):- ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना IIT, IIM यासारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळतो, तसेच MHT-CET या परीक्षेमध्ये ९० परसेंटाइलच्या वर २७ व ८० पर्सेंटाइलच्या वर ५४ विद्यार्थी गुण मिळवून यशस्वी होतात तर, विद्यालयातील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत येतात हे निश्चितच अभिमानास्पद आहे. शिक्षकांबरोबर पालकांचेही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख यांनी केले.

इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील व स्पर्धा परीक्षेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच पार पडला. यावेळी डॉ.अनिकेत देशमुख बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांनी या शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेपासून विद्यार्थी हित लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे नवोपक्रम राबवित आलेली आहे. याचाच एक भाग म्हणजे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षांमध्ये सांगोला तालुक्यातील पहिला क्रॅश कोर्स अल्प फी मध्ये सुरु केला व एकूण ३८ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थ्यांना शासकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाला, तेव्हापासून आजच्या ११ व्या क्रॅश कोर्स पर्यंत आम्ही विद्यार्थ्यांसाठी विशेष परिश्रम घेत असल्याचे सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांमधून समृद्धी माळी व पूजा पाटील तर पालकांमधून श्री.सतीश पाटील व सौ माळी यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा. संतोष राजगुरू व सौ राणी आदलिंगे मॅडम यांचा गुलाब पुष्प व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तर विशेष सत्कारामध्ये या शैक्षणिक संकुला मधील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख सौ. खंदारे मॅडम यांचा चिरंजीव आय.आय.टी.एन भूषण खंदारे याने तीन लाख विद्यार्थ्यांमधून आय.आय.एम. अहमदाबाद येथे एम. बी. ए. साठी प्रवेश मिळाल्याबद्दल त्यांचा संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख व संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांच्या शुभहस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी संस्था सदस्य प्रा.डॉ.अशोकराव शिंदे, प्रा.दीपक खटकाळे, प्रा.जयंत जानकर, न्यू इंग्लिश स्कूल, ज्युनियर कॉलेज सांगोला चे प्राचार्य प्रा.केशव माने, डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शंकर धसाडे, उपप्राचार्य प्रा. संतोष जाधव, उपमुख्याध्यापिका सौ.वैशाली घोडके मॅडम, पर्यवेक्षक श्री तात्यासो इमडे सर, श्री माणिक देशमुख सर यांच्यासह शिक्षक वर्ग, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.इंदिरा येडगे व सौ.स्मिता इंगोले मॅडम यांनी केले. प्रास्ताविक प्रा.सौ.निलिमा मिसाळ यांनी केले, तर आभार उपमुख्याध्यापिका सौ. वैशाली घोडके मॅडम यांनी मानले.

# घेरडी येथील जळीतग्रस्त कोळेकर कुटुंबाला आपुलकीचा आधार

सांगोला(प्रतिनिधी):-घेरडी येथील जळीतग्रस्त श्री. अंकुश कोळेकर यांच्या कुटुंबीयांना आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांच्या वतीने संसारोपयोगी साहित्य भेट देण्यात आले. याशिवाय शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक वस्तूंचेही वितरण करण्यात आले.

वाकी- घेरडी रस्त्यानजिक असलेल्या वस्तीवर अंकुश कोळेकर यांचे राहते छप्पर आहे. गुरुवारी दुपारी अचानक लागलेल्या आगीत ते पूर्णतः जळून भस्मसात झाले. यात त्यांची एक जर्सी गायही मरण पावली. पूर्णपणे उघड्यावर आलेल्या या कुटुंबाची माहिती मिळाल्यानंतर आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने त्यांना मदत देण्याचे ठरवून शनिवारी सकाळी मदत पोहोच करण्यात आली.

या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, कार्यकारिणी सदस्य डॉ. मच्छिंद्र सोनलकर, सदस्य सर्वश्री प्रा. बाळासाहेब वाघमारे, अमर कुलकर्णी, अरविंद डोंबे गुरुजी, व घेरडी येथील रमेश अवताडे सर तसेच कोळेकर कुटुंबीय उपस्थित होते.

डॉ.बोराडे हॉस्पिटल
२४ तास अत्यावश्यक सेवा
मोबा: ९६३७२१८०९०
कडलास रोड, सांगोला.
हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, विषबाधा, पॅरेलेसिस फिट्स,
लिव्हर, किडनीचे आजार या व अशा आजारावर निदान व उपचार
डॉ. प्रमोद धर्मराज बोराडे. MBBS D.N.B (मेडिसीन)
डॉ. सौ. प्राजक्ता प्रमोद बोराडे B.A.MS DRCH (स्त्री रोग तज्ञ)
आपल्या हक्काचं हॉस्पिटल डॉ.बोराडे हॉस्पिटल

ओळख कायद्याची : एक सामाजिक जबाबदारी आणि पोक्सो कायद्याची सविस्तर ओळख : पुढील भाग

# बालकांचा लैंगिक छळ

'ओळख कायद्याची' या सदराच्या मागील काही भागांमध्ये आपण बालकांवरील प्रत्यक्ष शारीरिक अत्याचाराबद्दल (फिजिकल अब्युज) माहिती घेतली. परंतु, समाजाचा असा एक मोठा गैरसमज आहे की केवळ शरीराला चुकीचा स्पर्श करणे म्हणजेच अत्याचार. प्रत्यक्षात, बालकांना मानसिक त्रास देणे, त्यांची छेडछाड करणे, किंवा त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा देखील कायद्याच्या नजरेत तितकाच अत्यंत गंभीर गुन्हा आहे. आज आपण पॉक्सो कायद्याच्या कलम ११ व १२ मधील'बालकांचा लैंगिक छळ' (सेक्शुअल हॅरासमेंट)या विषयावर सविस्तर चर्चा करणार आहोत.

लहान मुलांचे भावविश्व अतिशय नाजूक आणि कोमल असते. रस्त्याने चालताना, शाळेत किंवा शिकवणीला जाताना, बागेत खेळताना किंवा अगदी घरातून ऑनलाईन विश्वात वावरताना अनेकदा त्यांच्याकडे चुकीच्या, वासनांध नजरेने पाहिले जाते. अशा घटनांचा बालकांच्या मानसिक विकासावर अत्यंत खोल आणि दूरगामी परिणाम होतो. भीतीमुळे मुले अबोल होतात, त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. अशा प्रकारच्या मानसिक छळाला आणि तथाकथित 'रोमिओगिरी'ला आळा घालण्यासाठी कायद्याचे हे कलम अत्यंत प्रभावी आणि कडक आहे.

बालकांचा लैंगिक छळ म्हणजे नेमके काय? (कलम ११ ची व्याप्ती):जर कोणत्याही व्यक्तीने 'लैंगिक हेतूने' (वाईट उद्देशाने) बालकासोबत खालीलपैकी कोणतेही कृत्य केले, तर तो पॉक्सो कायद्यानुसार 'लैंगिक छळ' (सेक्शुअल हॅरासमेंट) मानला जातो:

१.शब्द आणि हावभाव (व्हर्बल अँड जेस्चरल अब्युज):बालकाला उद्देशून कोणतेही अश्लील शब्द उच्चारणे, त्यांच्या शारीरिक वाढीवरून अश्लील शेरेबाजी करणे, त्यांच्यासमोर घाणेरडे आवाज काढणे (उदा. शिट्टी मारणे, गाणी म्हणणे), डोळा मारणे, किंवा फ्लाइंग किस देण्यासारखे अश्लील हावभाव करणे. या गोष्टींमुळे बालकाला सार्वजनिक ठिकाणी लाजिरवाणे वाटू शकते.

२.अश्लील गोष्टी दाखवणे:सार्वजनिक ठिकाणी, बसमध्ये किंवा बागेत बालकासमोर शरीराचे कोणतेही गुप्त अवयव जाणीवपूर्वक उघडे करून दाखवणे (फ्लॅशिंग), किंवा स्वतःच्या मोबाईलवर अश्लील साहित्य (फोटो, व्हिडीओ) लावून ते बालकाला पाहण्यास भाग पाडणे.

३.पाठलाग करणे (स्टॉकिंग):बालकाच्या इच्छेविरुद्ध शाळेत, शिकवणीत किंवा घरापर्यंत त्याचा सतत पाठलाग करणे, त्याच्या येण्या-जाण्याच्या मार्गावर मुद्दाम उभे राहणे किंवा त्याच्यावर पाळत ठेवणे. यामुळे बालकाच्या मनात कायमस्वरूपी भीती आणि दहशत निर्माण होते.

४.ऑनलाईन छळ (सायबर हॅरासमेंट):

आजच्या डिजिटल युगात हा धोका सर्वात मोठा आहे. खोटे प्रोफाईल बनवून डिजिटल माध्यमांचा (इंटरनेट, इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सप) वापर करून बालकांशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करणे, त्यांना अश्लील मेसेज किंवा फोटो पाठवणे, त्यांच्या इंटरनेटवरील हालचालींवर पाळत ठेवणे, किंवा त्यांच्या फोटोंवर अश्लील कमेंट्स करणे.

५.अयोग्य प्रश्न विचारणे:बालकाला त्याच्या किंवा त्याच्या कुटुंबाच्या खाजगी आयुष्याविषयी, शारीरिक बदलांविषयी सातत्याने चुकीचे किंवा घाणेरडे प्रश्न विचारून त्याला जाणीवपूर्वक अस्वस्थ करणे.



कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन :
**अॅड.बी.आर.माने**
(मुंबई उच्च न्यायालय, एम.बी.ए. (एच.आर.), एम.बी.ए. (मार्केटिंग), डी.एल.एल., एलएल.बी. (क्रिमिनल), एलएल.एम. (क्रिमिनल), पी.जी.डी. (सायबर लॉ),मुंबई),
ईमेल: adv.bmane@gmail.com

या कलमाचे सर्वात मोठे आणि महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये'शारीरिक स्पर्श' (फिजिकल टच) असण्याची कोणतीही अट नाही.गुन्हेगाराने केवळ दूरून केलेली छेडछाड किंवा नजरफेक देखील या कायद्याअंतर्गत अत्यंत गंभीर गुन्हा ठरते. शिक्षेची तरतूद आणि कायदेशीर परिणाम (कलम १२):लहान मुलांच्या मानसिकतेवर आणि बालपणावर असा भयंकर आघात करणाऱ्या या गुन्ह्याला कायदा अजिबात हलक्यात घेत नाही. या गुन्ह्यासाठी कायद्याने गुन्हेगाराला ३ वर्षांपर्यंतचा सक्तमजुरीचा तुरुंगवास आणि मोठा दंड अशी कडक शिक्षेची तरतूद केली आहे. जर एखादा गुन्हेगार अशा प्रकारचा छळ वारंवार करत असेल, तर त्याच्या शिक्षेत लक्षणीय वाढ होऊ शकते. शिवाय, समाजात त्याची ओळख एक विकृत गुन्हेगार म्हणून नोंदवली जाते. अशा प्रकरणांमध्ये न्यायालय बालकाने दिलेला जबाब अत्यंत गांभीर्याने घेते.

पालक आणि समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा संदेश: आपल्या समाजात अनेकदा शाळेत जाणाऱ्या मुलींना किंवा अगदी लहान मुलांना रस्त्यावरील टारगट मुलांकडून अशा प्रकारच्या छेडछाडीला (इव्ह-टीझिंग) सामोरे जावे लागते. अनेकदा बदनामीच्या किंवा भीतीपोटी पालक मुलांना हे तर नेहमीचेच आहे, दुर्लक्ष कर, किंवा तू तो रस्ताच बदलून टाक असा चुकीचा आणि माघार घेण्याचा सल्ला देतात. पण या दुर्लक्षामुळेच गुन्हेगारांचे धाडस वाढते आणि पुढे जाऊन मोठ्या गंभीर गुन्ह्यांची (उदा. बलात्कार किंवा अपहरण) बीजे रोवली जातात.

पालकांनी याऐवजी एक सुरक्षित वातावरण तयार केले पाहिजे जिथे मुले त्यांच्यासोबत घडलेला असा प्रसंग मोकळेपणाने सांगू शकतील. मुलांच्या वर्तणुकीत अचानक झालेले बदल (उदा. शाळेत जाण्यास नकार देणे, एकटे राहणे, अचानक घाबरणे) पालकांनी ओळखले पाहिजेत. मुलांना अशा विकृत प्रवृत्तींविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवायला शिकवा. अशा प्रसंगी तुझी काहीही चूक नाही, तर चूक त्या त्रास देणाऱ्या व्यक्तीची आहे, हा विश्वास त्यांच्यात निर्माण करा. वेळेत पोलिसांत किंवा चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) वर तक्रार केल्यास अशा गुन्हेगाराला पॉक्सो कायद्याचा आणि पोलिसांच्या कारवाईचा मोठा दणका बसू शकतो आणि समाजातील इतर मुलांचेही भविष्यात रक्षण होऊ शकते.

वैधानिक इशारा व विशेष सूचना:सदर माहिती केवळ कायदेशीर जनजागृती आणि सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी दिली आहे. अधिक सविस्तर माहिती आणि प्रत्यक्ष कायदेशीर शब्दावलीसाठी वाचकांनी मूळ कायद्याचा संदर्भ घ्यावा. या कायद्यानंतर नजीकच्या भविष्यात आम्ही समाजासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या इतर अनेक प्रमुख कायद्यांवर सविस्तर चर्चा करणार आहोत. त्यामुळे नवनवीन कायदेशीर माहितीसाठी आमच्याशी जोडलेले राहा. हा माहितीपूर्ण लेख भारतातील विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रॅक्टिस करणारे उच्चशिक्षित आणि अनुभवी वकील अॅड. बी. आर. माने यांच्याकडून जनहितासाठी शेअर करण्यात आला आहे.

# फॅबटेक मेकॅनिकल मधील गणेश राऊत याची स्पाकॉन ईपीसी इंडिया कंपनीत निवड



सांगोला :- फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा विद्यार्थी गणेश संतोष राऊत याची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे स्पाकॉन ईपीसी इंडिया प्रा. लि. या नामांकित अभियांत्रिकी कंपनीमध्ये निवड झाली.

स्पार्कॉन ईपीसी इंडिया प्रा. लि. ही भारतातील अभियांत्रिकी, साहित्य खरेदी व औद्योगिक प्रकल्प उभारणी क्षेत्रातील विश्वासार्ह कंपनी म्हणून ओळखली जाते. ऊर्जा, तेल व वायू, रासायनिक उद्योग, औषधनिर्मिती, अन्न प्रक्रिया, सिमेंट, खत तसेच विविध उत्पादन उद्योगासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रकल्पांचे नियोजन, रचना, साहित्य पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयना ची जबाबदारी कंपनी यशस्वीपणे पार पाडते.

# स्वेरीच्या पाच विद्यार्थ्यांची 'एरोसिस एचव्हीएसी कंपनीत निवड

पंढरपूर: एरोसिस एचव्हीएसी प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'एरोसिस एचव्हीएसी प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील अक्षता लक्ष्मण खताळ, प्रतिक्षा नवनाथ चौगुले, आदित्य गिरीश पवार, माऊली संजय गोरे व संकेत संतोष मगर या पाच विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी वार्षिक रुपये चार लाखांचे पॅकेज मिळाले आहे. ही कंपनी प्रामुख्याने एचव्हीएसी या क्षेत्रात कार्यरत आहे.

Vi कंपनीच्या सिमविक्रीस होतकरू सेल्समन पाहिजेत (सांगोला तालुका)
टार्गेटनुसार चांगले काम चांगले पेमेंट
प्रत्यक्ष भेटा : कदम टेलिकॉम,
वासुद रोड, माने कॉम्प्लेक्स, सांगोला
TSM म्हेत्रे सर 9923006166

पाहिजेत
फॅमिली कार साठी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे तसेच ऑफिस कामासाठी गरजू व होतकरू कर्मचारी पाहिजे.
आकर्षक पगार दिला जाईल.
संपर्क: 9850403773

१५ गुंठे जागा विकणे आहे.
सांगोला पोलिस ठाणे व मार्केट कमिटीच्या लगत असलेली गट क्रमांक ६६६ मधील १५ गुंठे जागा विकणे आहे.
गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा.
संपर्क:- मो.९८६०९८१११८, ७७२००६६३७५

## ऑलिम्पियाडमध्ये फॅबटेक स्कूलचा सुवर्णझेंडा: गोल्डन स्कूल अवॉर्ड'चा मान

सांगोला :- राष्ट्रीय स्तरावरील इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सांगोला येथील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तेची राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा प्रभावी छाप पाडली असल्याची माहिती प्राचार्य सिकंदर पाटील यांनी दिली.

स्पर्धेच्या दुसऱ्या स्तरात इयत्ता चौथीतील आरोही मस्के हिने हिंदी विषयात महाराष्ट्रात चौथा क्रमांक पटकावला, तर इयत्ता पाचवीतील राजवर्धन गाढवे याने हिंदी विषयात महाराष्ट्रात तिसरा क्रमांक मिळवत शिष्यवृत्ती साठी पात्रता मिळवली. याचबरोबर तनिष खांडेकर, श्रेयश शिंदे, ईश्वरी पाटील, श्रेयश खंडागळे, साईराज जानकर आणि नुमा शेख या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, गणित, विज्ञान व हिंदी या विषयांमध्ये उल्लेखनीय प्राविण्य मिळवत प्रमाणपत्रे व पदके प्राप्त केली.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, सक्षम मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्ता यासाठी फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सांगोला यांना प्रतिष्ठेचा 'सुवर्ण शाळा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान शाळेच्या विश्वस्त सुरेखा भाऊसाहेब रुपनर यांनी स्वीकारला.

तसेच स्कूलचे प्राचार्य सिकंदर पाटील यांना 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार', ऑलिम्पियाड समन्वयक फरीदा मुलाणी यांना 'सर्वोत्कृष्ट ऑलिम्पियाड समन्वयक पुरस्कार', तसेच विविध विषयांचे प्रभावी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्राचार्य, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त असून फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# पंढरपूर-मल्हारपेठ मार्गावरील चिलार पाच दिवसांत हटवा; अन्यथा आंदोलनाचा इशारा



महूद (वार्ताहर):- आषाढी वारीच्या निमित्ताने कोकण, सातारा, सांगली, कोल्हापूर आदी भागांतून असंख्य पालखी सोहळे आणि पायी दिंड्यांच्या माध्यमातून लाखो वारकरी महूद मार्गे पंढरपूरकडे जात असतात. मात्र, सध्या महूद ते पंढरपूर या पालखी मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर काटेरी चिलारीची झाडे-झुडपे वाढली असून हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला आहे. या मार्गावरील चिलार तातडीने काढून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा व रिपब्लिकन बहुजन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.या संदर्भात भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप केसकर आणि रिपब्लिकन बहुजन सेनेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर थोरात यांच्यासह महूद येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पंढरपूर येथील उपअभियंत्यांना एक निवेदन दिले आहे.

सध्या प्रशासनाकडून फक्त ट्रॅक्टरच्या सहाय्याने वरवर साईड पट्टी स्वच्छ करण्याचे काम सुरू आहे. मात्र, ही झाडे मुळासकट न काढल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने केवळ मलमपट्टी न करता 'जेसीबी'च्या साहाय्याने ही चिलार मुळासकट उपटून टाकणे आवश्यक आहे.

येत्या पाच दिवसांत ही काटेरी झुडपे न हटवल्यास रिपब्लिकन बहुजन सेनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. हे निवेदन देताना भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप केसकर, रिपब्लिकन बहुजन सेनेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर थोरात आणि सागर साबळे उपस्थित होते.

## चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमाने साजरा

पंढरपूर (प्रतिनिधी):- सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी कारखाना सहयोग ओंकार शुगर कार्पोरेशन प्रा.लि, चंद्रभागानगर,भाळवणी कारखाना कार्यस्थळावर ओंकार साखर कारखाना प्रा.लि, युनिट नं.१ ते २० चे चेअरमन व अशोक नागरी सह.बँकेचे संस्थापक बाबुराव बोत्रे पाटील यांचा वाढदिवस विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवुन साजरा करण्यात आला.

कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यस्थळावरील वसंतराव काळे विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांचे हस्ते केक कापून बाबुरावजी बोत्रे-पाटील यांचा वाढदिवस आनंदाने साजरा करण्यात आला. यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर आर.आर.साळुंखे, प्र.कार्यकारी संचालक पी.डी.घोगरे व सर्व अधिकारी यांचे शुभहस्ते शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. कंपास, वह्या व खाऊ मिळाल्यामुळे सर्व चिमुकल्यां विद्यांर्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद दिसून येत होता. तसेच वाढते औद्योगिकरण, वृक्षतोड, वाढते तापमान यामुळे निसर्गाचा समतोल बिघडत चालला असून, त्याचा आरोग्यावर व शेतीवर परिणाम होत असल्यामुळे कारखाना कार्यस्थळावर वृक्षारोपन करण्यात आले व सर्व कर्मचाऱ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आला. तसेच पंढरपूर येथील मुकबधीर व मतिमंद शाळेतील मुलांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.

|| खुष खबर || || खुष खबर || || खुष खबर ||
आता सांगोल्यामध्ये जुने कपाट नविन करून मिळणार तेही घरी येऊन
अरमान अली स्टिल फर्निचर
प्रोप्रा. मुन्ना मिस्त्री (बार्शीकर)
आमचे येथे सर्व नामवंत कंपनीचे कपाट दुरुस्त करुन, तसेच लॉक व काच बदलून मिळेल.
तसेच सदरील कामे घरी येवून हि केली जातील...
(टिप आंतर मर्यादा ३० कि. मी. पर्यंत)



आमचा पत्ता
चिंचोली रोड, मोहिते डॉक्टर समोर, आनंदनगर, सांगोला
संपर्क: 7066289266

TATA POWER
SOLAROOF
भारताची क्र. १ ची सोलर रूफटॉप कंपनी*
TATA
अधिकृत चॅनल पार्टनर: सनर्जी सोलर
संपर्क : 9022908009 / 9075929191
8009300996. मार्केट यार्ड समोर, पंढरपूर रोड, सांगोला
हे ऑन तर क्वालिटी लाइफलाँग

हॉस्पिटल मध्ये रात्रपाळी साठी काम करण्यासाठी गरजू व होतकरू कामगार पाहिजेत.
(पुरुषांना प्राधान्य)
संपर्क:
नागणे हॉस्पिटल, कडलास नाका, सांगोला
मो .8956383505

माऊली एजन्सी, सांगोला
कामगार पाहिजेत

| अ.क्र. | पद | जागा |
|---|---|---|
| १) | सेल्समन | ०८ |
| २) | लोडर | १२ |
| ३) | ड्रायव्हर | ०२ |

अपेक्षेपेक्षा चांगला पगार दिला जाईल.
मो. 7083369595, 9579667676, 7020396615

कामगार पाहिजेत
दुकानात काम करण्यासाठी गरजू व होतकरू कामगार पाहिजेत.
आकर्षक पगार दिला जाईल
संपर्क: हेमंत विष्णू तेली
जय भवानी चौक ,सांगोला
9422460931

गुडलक टेलर
माने कॉम्पलेक्स, न्यू इंग्लिश स्कूल समोर, वासूद रोड, सांगोला
* विविध नामवंत कंपनीच्या कापडासह कपडे शिवून मिळतील.
प्रोप्रा.भगवान पांडुरंग खटके
मो.९७६५२२३१८७



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः संतोष प्रभाकर काटे, सोमनाथ प्रभाकर काटे, मौजे नवी लोटेवाडी परिसरातील लोकांना खालील सही करणारे आमचे अशिलातर्फे या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डी. सोलापूर सब डी. व तालुका सांगोला पैकी मौजे नवी लोटेवाडी येथील जमीन गट नंबर १२० क्षेत्र ०.४१ आर पो ख. ०.०३ आर ही मिळकत आमचे अशेलाचे वडील श्री.तुकाराम नाना काटे यांचे वडीलार्जित मालकीचे होती. सदरची जमीन तुकाराम काटे यांनी सदर जमीन परत फिरवून घेण्याची बोलीवर श्री.बाळासाहेब सुखदेव कारंडे राहणार तिसंगी तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर यांना खरेदी दिलेली होती. तुकाराम काटे हे दि.१३/०८/२०१३ रोजी मयत झाले. सदरची जमीन तुकाराम काटे यांची मुले भागवत तुकाराम काटे व आमचे अशिलाने दि.२८/०२/२०२० रोजी खरेदी घेण्याचे ठरविले त्याच दिवशी वरील जमीन पैकी ०.२० आर क्षेत्र भागवत तुकाराम काटे यांचे नावे खरेदी केली व राहिलेले क्षेत्र ०.२१ पो ख.०.०३ आमचे अशिलाचे नावे खरेदी घेण्यास पैशाचे अडचण असल्याने तुम्ही नंबर १ व २ यांचेकडून आमचे अशिलाने रक्कम रुपये २,००,००० व्याजी घेऊन सदर रकमेस तारण म्हणून त्याच दिवशी तुम्ही आमचे अशिलाचे जवळचे नातेवाईक असल्याने विश्वासाने तुम्ही नंबर १ व २ यांचे नावे खरेदी खताचा दस्त बाळासाहेब कारंडे यांच्याकडून नोंदवून घेतलेला आहे. सदर जमिनीपैकी क्षेत्र ०.२१ आर पो ख.०.०३ आर त्यातील राहते घरासह क्षेत्र वडिलांपासून आमचे अशिलाचे प्रत्यक्ष ताब्यात असून आमचे अशिल सदर क्षेत्र वहिवाटून उपभोग घेत आहेत. आमचे अशिल रितसर कायदेशीर मार्गाने सदर मिळकत तुम्ही नंबर एक व दोन यांचेकडून खरेदी घेणार आहेत. तुम्ही नंबर एक व दोन यांना सदर खरेदी खताने सदर गट नंबर १२० पैकी पूर्वेकडे क्षेत्राचा ताबा मुळीच दिलेला नाही. असे असताना तुम्ही नंबर एक व दोन यांनी सदर मिळकत आमचे अशिलाचे परस्पर विक्री करण्याचा बेकायदेशीर प्रयत्न चालविलेला आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नवी लोटेवाडी येथील जमीन गट नंबर १२० पैकी क्षेत्र ०.२१ आर पो ख.०.०३ आर संबंधी वरील नंबर एक व दोन यांचे बरोबर कोणतीही खरेदी, दान, गहाण, हस्तांतरणाचे कसलेही व्यवहार करू नये. सदरचे व्यवहार आमचे अशिलाचे वरील क्षेत्रावर आमचे अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

ता.११/०७/२०२६.

**अशिलातर्फे ॲड.** **सही**
**ॲड.जी.एन.पाटील** **अशिल**
**बी.ए.(ऑ) एल.एल.बी.**
**लक्ष्मीनारायण चिंचोली रोड, सांगोला**
**मो.९२२६९३०८६०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे सांगोला येथील नागरीकांस कळविण्यात येते की, :-कसबे सांगोला येथील स. नं. १०४/२, क्षेत्र हे २.६४ आर, स. नं. ११५/१, क्षेत्र हे ३.८२ आर या जमीनी भीमराव गोपीनाथ खडतरे, सचिन, शैलेश व नितीन भीमराव खडतरे यांचे नांवे आहेत. मात्र सदर जमीनी सदर भीमराव, आमचे अशिल महादेव गोपीनाथ खडतरे व त्यांचे बंधु यांचे हिंदू एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या आहेत या जमीनी व इतर मिळकतीचे वाटपाचा दावा रे.मू.नं. ६४१/२०२१ चा सांगोला येथील मे. दिवाणी कोर्टात प्रलंबित आहे व या दाव्याची नोटीस आमचे अशिलांनी रीतसर नोंदविलेली आहे. दरम्यान सदर जमीनीस नांवे आहे याचा गैरफायदा घेवून भीमराव खडतरे व इतरांनी सदर जमीनी विकण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

तरी सदर जमीनीबाबत वाटपाचा दावा प्रलंबित आहे व त्यात आमचे अशिलांचा हिस्सा आहे. याची जाणिव सर्वांना असावी व कोणाची फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

दि.१२/०७/२०२६

**सही**
**ॲड.सुधिर कृष्ण रानडे**
**२३१९, कुंभार घाट, पंढरपूर जि. सोलापूर ४१३३०४**
**मो.९८८१०५४६४६, ७०२०६०६७३६**

## जाहीर नोटीस

जन्म नोंद अर्ज नंबर ३७/२०२६

सांगोला येथील मा.तहसीलदार सो यांचे कोर्टात

ब्रम्हदेव महादेव नलवडे वय ५२
रा.मु.पो.शिरभावी ता.सांगोला जि.सोलापुर — अर्जदार
विरूध्द
ग्रामविकास अधिकारी शिरभावी — सामनेवाला
रा.मु.पो.शिरभावी ता. सांगोला जि.सोलापुर.

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दि.०२/०१/१९७३ रोजी मौजे शिरभावी ता. सांगोला येथे अर्जदार यांचे राहते घरी झालेला आहे. या कारणाने सदर जन्माची नोंद मौजे शिरभावी ग्रामपंचायत दप्तरी करण्याचे अज्ञानाने व अनावधानाने राहुन गेले आहे. तरी अर्जदार यांना त्यांचे जन्माचे दाखलेची गरज भासलेने अर्जदार यांनी या मे.कोर्टात जन्माची नोंद शिरभावी ग्रामपंचायत यांचे दप्तरी दाखल होवुन तसा दाखला मिळणेचे कामी आदेश होवुन मिळावेत म्हणुन ॲड.प्रविण शशिकांत पाटील यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी कोणाची, त्या बाबत कोणतीही व कसलीही हरकत आसेल त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासुन तीस दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारीख २०/७/२०२६ रोजी स्वतः अगर वकीला मार्फत लेखी हरकत घेणे कामी माझेसमोर उपस्थीत रहावे. अन्यथा सदरील अर्जदार यांचे नावाची नोंद गाव दप्तरी दाखल करून तसा दाखला अर्जदार यांना देणे बाबतचे योग्य ते हुकुम या कोर्टाकडुन केले जातील. या नंतर येणारे कोणत्याही तक्रारी लागु होणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. दिनांकः- /०१/२०२६.

**सही**
**तहसिलदार सांगोला**

सांगोला तालुका माध्य.व उच्च माध्य. शाळा मुख्याध्यापक संघ सांगोला
ता.सांगोला जि.सोलापूर
मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवापूर्ती समारंभ
यांच्या सन्माननीय सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या
सत्कार समारंभ
आपली उपस्थिती हीच आमच्यासाठी आनंदाची व प्रेरणादायी ठरेल
आपणास सेवानिवृत्तीनंतरच्या निरामय, आनंदी व आरोग्यसंपन्न आयुष्यासाठी
मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा...!
कार्यक्रमाचे अध्यक्ष
आ.डॉ.बाबासाहेब देशमुख
विधानसभा सदस्य
प्रमुख पाहुणे
मा.आ.शहाजीबापू पाटील — माजी विधानसभा, सदस्य
आ.जयंत आसगावकर — विधानपरीषद सदस्य
मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील — माजी विधानपरीषद सदस्य
मा.श्री.चेतनसिंह केदार-सावंत — सभापती, शिक्षण व आरोग्य जि.प.सोलापूर
मा.प्रा.सुभाषराव माने — माजी अध्यक्ष, मुख्याध्यापक महामंडळ मुंबई
मा.सौ.पूनम ताई इंगवले — सभापती, पंचायत समिती सांगोला
मा.श्री.प्रबुध्दचंद्र झपके — अध्यक्ष, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ
मा.श्री.आनंदा माने — नगराध्यक्ष, सांगोला नगरपरिषद
मा.श्री.अशोक नवले — सिंहगड कॅम्पस डायरेक्टर कमलापूर
मा.श्री.सुयोग नवले — गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सांगोला
वार सोमवार दि.१३/०७/२०२६
वेळ सकाळी ११ वाजता
कार्यक्रमाचे ठिकाण: सिंहगड कॅम्पस, कमलापूर


सस्नेह निमंत्रण
INNER WHEEL
इनरव्हील क्लब ऑफ सांगोला
आपणास निमंत्रण देण्यात आनंद वाटतो की, इनरव्हील क्लब ऑफ सांगोल्याचे वर्ष २०२६–२०२७ चे नवनिर्वाचित
प्रेसिडेंट - सौ. वर्षा बलाक्षे, व्हाईस प्रेसिडेंट - सौ. वंदना महिमकर, सेक्रेटरी - सौ. वनिता चव्हाण आणि पदाधिकारी यांचा पदग्रहण समारंभ आज संपन्न होत आहे.
REACH & INSPIRE
for a better world
2024-2027
डिस्टिक चेअरमन
डॉ. दीपशिखा पाठक
प्रेसिडेंट
सौं. वर्षा बलाक्षे
सेक्रेटरी
सौं. वनिता चव्हाण
Grow & Flourish
International Inner Wheel theme
2026-2027
व्हाईस प्रेसिडेंट - सौं. वंदना महिमकर
ट्रेझरर - सौं. उमा उंटवाले
आय. एस. ओ. - सौं. अंजना बनकर
आय. पी. पी. - डॉ. सौं. सुजाता पाटील
एडिटर - सौं.दिपाली कोळसे पाटील
सी. एल. सी. सी - सौं. मंगल चौंगुले
एक्झिक्युटिव्ह मेंबर्स - सौं. वैशाली बेले
एक्झिक्युटिव्ह मेंबर्स - सौं. पल्लवी थोरात
एक्झिक्युटिव्ह मेंबर्स - सौं. सीमा गवळी
एक्झिक्युटिव्ह मेंबर्स - सौं. प्रज्ञा चोगुले
एक्झिक्युटिव्ह मेंबर्स - सौं. गीता मोहिते
एक्झिक्युटिव्ह मेंबर्स - सौं. सुरेखा सपाटे
विशेष मार्गदर्शन - सौं. प्रतिमा माळी
विशेष मार्गदर्शन - सौं. रत्नप्रभा माळी
विशेष मार्गदर्शन - सौं. सुनंदा माळी
विशेष मार्गदर्शन - सौं. लतिका माळी
विशेष मार्गदर्शन - सौं. माधुरी गुळमिरे
विशेष मार्गदर्शन - श्रीमती सुवर्णा इंगवले
विशेष सहकार्य - सौं. सविता लाटणे
विशेष सहकार्य - सौं. अरुणा घोंगडे
विशेष सहकार्य - सौं. वैजयंती देशपांडे
विशेष सहकार्य - सौं. स्वाती अंकलगी
विशेष सहकार्य - सौं. अश्विनी कांबळे
विशेष सहकार्य - सौं. मंगल लाटणे
विशेष सहकार्य - सौं. शुभांगी पाटील
विशेष सहकार्य - सौं. सुनीता राऊत
इनरव्हील धन्वंतरी - डॉ. सौं. सुपर्णा केळकर
इनरव्हील धन्वंतरी - डॉ. सौं. रुपाली बुरांडे
इनरव्हील निर्भया रक्षक - सौं. शबनम शेख (महाराष्ट्र पोलीस)
क्लब सदस्य - सौं. शालिनी पाटील
क्लब सदस्य - सौं. विद्या बनकर
क्लब सदस्य - सौं. संगीता चोगुले
क्लब सदस्य - सौं. लता गोडसे
क्लब सदस्य - श्रीमती स्वाती ठोंबरे
क्लब सदस्य - सौं. करुणा जांगळे
क्लब सदस्य - सौं. रेखा घोंगडे
क्लब सदस्य - सौं. अनिता कमले
क्लब सदस्य - सौं. शारदा जाधव
क्लब सदस्य - सौं. कविता रेड्डी
क्लब सदस्य - सौं. गंगा फुले
क्लब सदस्य - सौं. धनलक्ष्मी होनराव
क्लब सदस्य - सौं. रुक्मिणी आदलिंगे
क्लब सदस्य - सौं. विजया खडतरे
क्लब सदस्य - सौं. अर्चना इंगवले
क्लब सदस्य - सौं. विजया बनसोडे
क्लब सदस्य - सौं. वर्षा देशपांडे
क्लब सदस्य - सौं. सीमा कुलकर्णी
क्लब सदस्य - सौं. अर्चना म्हेत्रे
क्लब सदस्य - सौं. संगीता पाखरे
क्लब सदस्य - सौं. सुशीला नांगरे
क्लब सदस्य - सौं. कविता दिवटे
क्लब सदस्य - सौं. माधुरी चव्हाण
क्लब सदस्य - सौं. विद्या वलेकर
क्लब सदस्य - सौं. शोभा माळी
क्लब सदस्य - श्रीमती अनुराधा पाटील
नूतन सदस्य - सौं. अंकिता धसाडे
नूतन सदस्य - डॉ. सौं. वर्षा सोनलकर
नूतन सदस्य - सौं. विद्या नरुटे
नूतन सदस्य - सौं. सुवर्णा पाटील
नूतन सदस्य - सौं. सारिका टिंगरे
नूतन सदस्य - सौं. स्वराली कुलकर्णी
नूतन सदस्य - सौं. अर्चना इंगोले
नूतन सदस्य - सौं. संगीता गायकवाड
नूतन सदस्य - डॉ.दिव्यता केदार
वेळ: रविवार दि.१२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता
स्थळ: श्रीराम हॉटेल, सोलापूर-कोल्हापूर रोड, सांगोला